MHKO070001302003

**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ४०/२००३, नि. १६२ वरील आदेश</u>**

**(इब्राहिम आप्पालाल पिंजारी आणि आणखीन १**

**विरुध्द**

**मिरासाब बाबालाल पिंजारी आणि इतर २९ )**

प्रस्तुत दाव्याचे कामातील प्रतिवादी क्र. १(२) हे दि. २८/०५/२०२१ रोजी मयत पावले असून वादीने निशाणी क्र. १६२ कडे वरील अर्ज सादर केला आहे. त्या पृष्ठयर्थ प्रतिवादीचे मृत्यु प्रमाणपत्र देखील निशाणी क्र. १६३ कडे दाखल केलेले आहे. सदर प्रतिवादीचे वारसांना अभिलेखावर घेवून सुनावणी सुरु ठेवण्यात यावी अशी विनंती करण्यात येत आहे.

२. अर्जाचे अवलोकन करता असे दिसते की, मयत प्रतिवादीचे वारसांना अभिलेखावर मुदतीच्या आत घेण्यात आले आहे. अशा परिस्थीतीत आणि दाव्याचे स्वरुप पहाता अर्ज मंजूर होणेस पात्र असल्याचे माझे मत आहे. करीता खालील आदेश

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने प्रतिवादी क्र. १(२) च्या वारसांची नोंद मुळ वादपत्रामध्ये घ्यावी.

३. तद्नंतर वादीने दुरुस्ती दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

४. त्यानंतर प्रतिवादी क्र. १(२) च्या सर्व वारसांना प्रस्तुत दुरुस्ती दाव्याची आदेशिका पाठवण्यात यावी.

स्वाक्षरीत/–

( **आनंद दे. करभाजन** )

**प्रभारी** २ रे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, जयसिंगपूर,
ता. शिरोळ, जि. कोल्हापूर.

ठिकाण :– जयसिंगपूर

दिनांक :– २०/०८/२०२१